आधुनिक महाराष्ट्रातील शोषित-अंकित समूह

समस्या, संघर्ष आणि प्रतिकार

नमुना • SAMPLE

नमूना • SAMPLE

आधुनिक महाराष्ट्रातील शोषित-अंकित समूह

समस्या, संघर्ष आणि प्रतिकार

संपादक

डॉ. प्रदिप वाघमारे

नमूना • SAMPLE

अखण्ड पब्लिशिंग हाऊस

दिल्ली (भारत)

द्वारा प्रकाशित



अखण्ड पब्लिशिंग हाऊस

Publisher, Distributor, Exporter having an Online Bookstore

एल-9ए, प्रथम तल, गली न. 42,
सादतपुर एक्सटेंसन, दिल्ली-110094 (भारत)
Phone : 9968628081, 9555149955, 9013387535
E-mail : akhandpublishinghouse@gmail.com
akhandpublishing@yahoo.com
Website : www.akhandbooks.com

आधुनिक महाराष्ट्रातील शोषित-अंकित समूह
समस्या, संघर्ष आणि प्रतिकार

संस्करण : 2021
© संपादक
ISBN: 978-93-90870-00-4

सर्वाधिकार सुरक्षित। इस प्रकाशन के किसी भी हिस्से को प्रकाशक की पूर्व अनुमति के बिना इलेक्ट्रॉनिक या किसी अन्य माध्यम द्वारा पुनः प्राप्ति समेत किसी भी रूप में प्रतिलिपिकृत, अनुवादित, संगृहीत नहीं किया जा सकता है और न ही किसी भी रूप में या किसी भी माध्यम द्वारा इसे प्रसारित किया जा सकता है।

इस पुस्तक में लेखक द्वारा व्यक्त विचार उनके व्यक्तिगत हैं जिसका प्रकाशक और संपादक से कोई संबंध नहीं है।

भारत में प्रकाशित

झपसू यादव द्वारा 'अखण्ड पब्लिशिंग हाउस' के लिए प्रकाशित। वी.एम. ग्राफिक, दिल्ली द्वारा कवर डिजाइन व शब्द संयोजन तथा आरना इंटरप्राइजेज, दिल्ली से मुद्रित।

SAMPLE COPY

शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळीत
कार्यरत असणाऱ्या
जैविक विचारवंत व कार्यकर्त्यांना....

नमुना • SAMPLE

नमूना • SAMPLE

मनोगत

एकोणिसाव्या शतकातील वासाहतीक भारतामध्ये सबाल्टर्न जाणिवा त्यांच्या सामाजिक व आर्थिक चळवळी, राजकीय घडामोडी, आधुनिकतेकडे वाटचाल आणि राष्ट्र बनवण्याचा प्रक्रियेतून निर्माण झालेल्या दिसतात. परंतु अकादमिक दृष्टिकोनातून भारतीय उपखंडातील या शोषित-अंकित जनसमूहांच्या विविध चळवळींकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले गेले. ह्या सामाजिक वर्गाच्या चळवळींचा उल्लेख आपणाला साम्राज्यवादी, राष्ट्रवादी आणि मार्क्सवादी इतिहास लेखनप्रवाहातून प्रतिबिंबित झालेला दिसून येत नाही. त्यामुळेच ही उणीव भरून काढण्यासाठी १९८०च्या दशकात सबाल्टर्न स्टडीजच्या माध्यमातून ह्या सामाजिक वर्गाच्या व त्यांच्या चळवळीवर नवीन सिद्धांत, पद्धती व विश्लेषण यांचा वापर करून नवीन इतिहास लेखनप्रवाह सुरू करण्यात आला. सबाल्टर्न स्टडीजच्या लेखनप्रवाहातील अभ्यासकांनी तळागाळातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळीवर लिखाण केले व त्यांचे जीवन, संघर्ष, विचारविश्व व प्रतिकार अधोरेखित केले. परंतु त्यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिदायी लढ्याच्या चळवळीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. रणजीत गुहांच्या अगोदर भारतामध्ये महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सबाल्टर्न समूहांच्या चळवळीवर लेखन करून शोषित-अंकित समूहांचे प्रश्न मांडलेले दिसून येतात.

सबाल्टर्न स्टडीजच्या लेखनप्रवाहाने भारताच्या विविध भागात उदयास आलेल्या दलित, आदिवासी, शेतकरी, कामगार व स्त्री वर्गाच्या चळवळीकडे विशेष लक्ष दिले नाही. सबाल्टर्न इतिहास लेखनाच्या मर्यादा ओळखून या समूहांच्या प्रश्नांची, समस्यांची व चळवळींची नव्याने मांडणी अनेक अभ्यासक करताना दिसतात. सदर ग्रंथात महाराष्ट्रातील संशोधकांनी नवीन साधने, पद्धती व अन्वेषणाच्या आधारे या चळवळींची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या शोधनिबंधातून वर्ग जात लिंगभाव व समाज यांचा आंतरसंबंध, पद्धती, संरचना, अनुभव, राजकारण, प्रतिकार आणि संघर्ष हा ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचालित माटुंगा, मुंबई येथील रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातील इतिहास विभागातर्फे दिनांक १० व ११ जानेवारी २०२० रोजी 'भारतातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळी : समस्या आणि आव्हाने' या विषयसूत्रावर दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचा निमंत्रक व आयोजक या नात्याने हा संपादित ग्रंथ आपल्यासमोर सादर करताना अतिशय आनंद होत आहे.

हा ग्रंथ संपादित करताना मला अनेक मान्यवरांनी प्रोत्साहन, मार्गदर्शन व मदत केलेली आहे त्या सर्वांचे आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो. सर्वप्रथम मी या चर्चासत्राच्या आयोजनाकरिता महाविद्यालयास आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिलेल्या भारतीय इतिहास अनुसंधान परिषद (इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, नवी दिल्ली) यांचे मी आभार मानतो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सुप्रतिष्ठित प्राध्यापक, ख्यातनाम इतिहासकार व आय.सी.एच.आर. चे सन्माननीय सदस्य प्रा. डॉ. श्री. म. उर्फ राजा दीक्षित यांनी मला नेहमीच प्रोत्साहित करून मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा विशेष ऋणी आहे.

राष्ट्रीय चर्चासत्रात अनेक इतिहासकार, तत्वज्ञानी, अर्थतज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्राचे अभ्यासक व विविध साहित्यतज्ञ भारताच्या विविध भागातून आपले संशोधन मांडण्यासाठी आले होते. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे हे चर्चासत्र यशस्वी होऊ शकले त्यामुळे मी या सर्वांचा आभारी आहे. चर्चासत्रात इंग्रजी, मराठी व हिंदी असे जवळजवळ शंभर शोधनिबंध सादर करण्यात आल होते. मराठी व हिंदी शोधनिबंधाचा वेगळा ग्रंथ काढावा यादृष्टीने विचारविनिमय झाला व पंचवीस शोधनिबंधापैकी निवडक सतरा मराठी व तीन हिंदी शोधनिबंध परीक्षणानंतर या संपादित ग्रंथामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या सर्व लेखकांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्यामुळे हा ग्रंथ वेळेत प्रकाशित होत आहे, त्यामुळे मी या सर्व लेखकांचा ऋणी आहे.

राष्ट्रीय चर्चासत्राचे सूत्र भारतातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळीविषयी असलं तरीसुद्धा या ग्रंथामध्ये समाविष्ट करण्यात आलेले अनेक शोधनिबंध हे महाराष्ट्रातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळीविषयी असल्यामुळे या ग्रंथास 'आधुनिक महाराष्ट्रातील शोषित-अंकित समूह : समस्या, संघर्ष आणि प्रतिकार' असे नाव देण्यात आलेले आहे. सदर पुस्तकात दलित चळवळ, भटके-विमुक्त आणि आदिवासी समूहांच्या चळवळी, शेतकरी व कामगार वर्गांच्या चळवळी आणि स्त्री वर्गांच्या चळवळी असे चार विभाग आहेत.

सदर ग्रंथाच्या संपादन कार्यात माझे गुरूवर्य प्रा. डॉ. किशोर गायकवाड यांनी मला सतत प्रोत्साहन दिले आणि मार्गदर्शन केले तसेच या ग्रंथाचे मुखपृष्ठ मिळवून दिल्याबद्दल त्यांचा मी विशेष आभारी आहे.

प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग, डॉ. मोहसिना मुकादम, डॉ. अनुराधा रानडे व डॉ. पांडुरंग महालिंगे यांनी शोधनिबंधाच्या परीक्षणामध्ये मदत केली व ग्रंथाच्या संपादनामध्ये मला मार्गदर्शन केले त्याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे. डॉ. नारायण भोसले व डॉ. अजयकुमार लोखंडे यांनी मला या अकादमीक कार्यात वेळोवेळी मदत केली त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार.

रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्या डॉ. अनुश्री लोकूर यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे हे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करणे शक्य झाले त्यामुळे त्यांचा मी विशेष ऋणी आहे. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुचेता केतकर व डॉ. मनीष हाटे यांचाही आभारी आहे.

राष्ट्रीय चर्चासत्र यशस्वी करण्यामध्ये हातभार लावलेले रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातील प्राध्यापक व आयोजन समितीतील सर्व सदस्य इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. लुईझा रॉड्रिग्स, डॉ. मोहसिना मुकादम, डॉ. वैभवी पळसुले, वर्षा माळवदे, डॉ. उर्मिला मून, डॉ. पांडुरंग महालिंगे, श्रीमती शिल्पा नेवे, श्रीमती ज्योती प्रदिप वाघमारे, डॉ. नम्रता जगताप, विक्की गायकवाड, अतिश निकम, विरेंद्र चौहान व विद्यार्थी स्वयंसेवक यांचा मी विशेष आभारी आहे.

चर्चासत्राच्या नियोजनापासून ते आयोजनापर्यंत माझ्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणारी व या ग्रंथाच्या संपादनात मदत करणारी माझी पत्नी प्रा. ज्योती प्रदिप वाघमारे यांचे विशेष आभार. माझे सर्व मित्र मंडळी व कुटुंबीय यांनी या अकादमीक कार्यात मदत केल्याने त्यांच्या ऋणातच राहणे मला आवडेल.

या ग्रंथाच्या मुखपृष्ठासाठी स्वत:चे चित्र वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल डॉ. अंबालिका सूद-जेकब यांचा मी विशेष आभारी आहे.

ग्रंथ प्रकाशनाची जबाबदारी अखण्ड पब्लिशिंग हाऊस, दिल्लीचे श्री. विरेन्द्र कुमार यादव यांनी पार पाडली व कोरोनासारख्या महामारीच्या स्थितीमध्येही हा ग्रंथ अगदी कमी वेळेत प्रकाशित केला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

जानेवारी २०२१ **डॉ. प्रदिप वाघमारे**

SAMPLE

नमूना • SAMPLE

अनुक्रमणिका

मनोगत *vii*

प्रस्तावना

-डॉ. प्रदिप वाघमारे..... १

विभाग १ दलित चळवळ

१. महाराष्ट्रातील वंचित घटकांसाठी बापूसाहेब राजभोज यांचे राजकीय कार्य

-डॉ. किशोर कोंडबाजी काजळे.....२१

२. आंबेडकरी चळवळीतील सुरबा टिपणीसांचे खंबीर नेतृत्व

-डॉ. रामचंद्र गायकवाड..... ३४

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटनात्मक कार्य

-डॉ. सुधाकर लहुपचांग..... ५५

४. बॉम्बे इलाख्यातील महार समाजाची सामाजिक स्थिती: १९०० – १९५०

-डॉ. मंगेश ग. सावंत..... ६४

५. नव्वदोत्तर विद्रोही साहित्य/सांस्कृतिक चळवळ - एक आढावा

-डॉ. लीना केदारे..... ७७

SAMPLE

विभाग २ भटके-विमुक्त व आदिवासी समूहांच्या चळवळी

६. महाराष्ट्रातील भटक्या - विमुक्तांच्या बंधमुक्तीच्या चळवळी
-डॉ. नारायण भोसले..... ९७

७. पालघर जिल्हयातील तलासरी तालुक्यातील आदिवासी वारली समाजाची स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळ
-डॉ. हेमलता मुकणे..... १०८

८. महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ – स्वरूप व दिशा
-विरेंद्र राजधर चौहान..... ११४

९. 'धूणी तपे तीर' में भील समाज का संघर्ष
–डॉ. पी. व्ही. महालिंगे..... १२१

विभाग ३ शेतकरी व कामगार वर्गाच्या चळवळी

१०. भूदान आंदोलन : भूमिहीन आणि जमिनींचे वितरण
-डॉ. रमिला दीपक गायकवाड..... १२७

११. स्वातंत्र्यपूर्व काळातील पालघर तालुक्यातील शेतकऱ्यांचे उठाव
-प्रेरणा राऊत..... १३५

१२. सर्वोदयी विचारधारा आणि कृषिक्षेत्र व शेतकरी विकास
-संध्या देवदत्त शिरोडकर..... १४२

१३. वंचित समूहांचे प्रश्न आणि अनिल अवचटांचे रिपोर्टाज
-शिल्पा नेवे..... १५१

१४. संजीव के "फांस" उपन्यास में किसान मजदूरों की समस्याएँ
–सरिता जिलेदार बिन्द..... १५७

SAMPLE

विभाग ४ स्त्री वर्गाच्या चळवळी

१५. 'स्त्रियांच्या चळवळीचे बदलते स्वरूप' - एक समीक्षा
-डॉ. वासुदेव डोंगरदिवे..... १६५

१६. सबाल्टर्न दृष्टिकोनातून स्त्रीवादी चळवळीतील काही स्थित्यंतरे
-डॉ. ज्योती अरविंद पोटे..... १७२

१७. स्वांतत्र्यपूर्व काळातील विदर्भातील दलित स्त्री चळवळ: एक विश्लेषणात्मक अभ्यास
-पल्लवी शेंडे..... १८७

१८. दलित स्त्रीवादी चळवळ: संघटनात्मक बुद्धिजीवींचा दृष्टिकोन
-पुनम गायकवाड १९४

१९. महात्मा फुले यांच्या समाजसुधारणा चळवळीचा महाराष्ट्रातील स्त्री जीवनावरील प्रभाव
-प्रदीप फापाळे..... २०५

२०. कमलेश्वर के उपन्यासों में नारी चित्रण
—गोदावरी नरेंद्र सब्बानी..... २१७

संपादक परिचय..... २३१

लेखक परिचय..... २३३

नमुना SAMPLE

नमूना • SAMPLE

प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकातील वासाहतीक भारतामध्ये शोषित-अंकित जनसमूहांच्या जाणिवांचा उदय व विकास झालेला दिसून येतो. या कालखंडामध्ये अनेक शेतकरी उठाव व आदिवासींचे बंड इंग्रज सरकारच्या व जमीनदारांच्या शोषणाच्या व दमणाच्या विरोधात पाहायला मिळतात. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ याच काळात सुरू होताना दिसते. तसेच दलित चळवळ व आदिवासींच्या चळवळी विस्तारित होताना दिसतात. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सबाल्टर्न जाणिवा त्यांच्या सामाजिक व आर्थिक चळवळी, राजकीय घडामोडी, आधुनिकतेकडे वाटचाल आणि राष्ट्र बनवण्याचा प्रक्रियेतून निर्माण झालेल्या दिसतात. परंतु अकादमिक दृष्टिकोनातून भारतीय उपखंडातील या शोषित-अंकित जनसमूहांच्या विविध चळवळींकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले गेले. ह्या सामाजिक वर्गाच्या चळवळींचा उल्लेख आपणाला साम्राज्यवादी, राष्ट्रवादी आणि मार्क्सवादी इतिहास लेखनप्रवाहातून प्रतिबिंबित झालेला दिसून येत नाही. त्यामुळेच ही उणीव भरून काढण्यासाठी १९८०च्या दशकात सबाल्टर्न स्टडीजच्या माध्यमातून ह्या सामाजिक वर्गाच्या व त्यांच्या चळवळीवर नवीन सिद्धांत, पद्धती व विश्लेषण यांचा वापर करून नवीन इतिहास लेखनप्रवाह सुरू करण्यात आला.

सबाल्टर्न (Subaltern) या संकल्पनेचा सर्वप्रथम वापर इटलीतील तत्वज्ञ आणि नवमार्क्सवादी विचारवंत अंतोनिओ ग्रामशी यांनी केला आहे. सबाल्टर्न म्हणजे निम्न वर्ग किंवा शोषित-अंकित जनसमूह. ग्रामशीने मार्क्सोत्तर विचारांची कोंडी फोडण्यासाठी केलेल्या चिंतनातून अनेक संज्ञा-संकल्पना जन्माला घातल्या. त्यात धुरीणत्व, सत्ता, जैविक बुद्धिजीवी, पारंपारिक बुद्धिजीवी, कॉमन सेन्स, प्रभुत्व, नागरी समाज याबाबत चिंतन केले आहे. त्यांनी त्यांच्या ग्रंथात विविध संकल्पनांचा वापर

SAMPLE

सबाल्टर्न जनसमूहांच्या जाणिवा अभ्यासण्यासाठी केला आहे.[१] ग्रामशीने इटलीत शोषित-अंकित समूहांच्या मुक्तीचे लढे उभारताना साम्यवादी विचार प्रणालीचीदेखील मौलिक चिकित्सा केली आहे. वैचारिक धुरीणत्वाची संकल्पना मांडून मार्क्सवादी विचार नव्या दिशेने पुढे नेला. पारंपारिक मार्क्सवादाच्या मर्यादा स्पष्ट करताना भौतिकवादाचीही चिकित्सा केली. धर्म, संस्कृती, भाषा, इतिहास, तत्त्वज्ञान आदी बाबी शासन संस्थेच्या दृढीकरणाला मदत करतात हे लक्षात घेऊन मार्क्सच्या भौतिकवादाची फेरमांडणी केली यामुळेच ग्रामशीला मार्क्सवादाचा भाष्यकार म्हणूनही ओळखले जाते.[२]

सबाल्टर्न इतिहास लेखनाच्या पद्धतीशास्त्रविषयाचे ग्रामशीचे विश्लेषण इतिहासलेखनाच्या नव्या प्रवाहाला जन्म देणारे ठरले. ग्रामशीने वापरलेल्या विविध संकल्पनांचा वापर करून अभ्यासक भारतातील प्रभुत्वशाली वर्गाचे विश्लेषण करतात. ग्रामशीचे हे विचारविश्व भारतीय अभ्यासकांना महत्त्वाचे वाटले याच सबाल्टर्न विचारप्रणालीच्या आधारे रणजीत गुहा आणि त्यांचे सहकारी संशोधक व अभ्यासक भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन करतात. इ.स. १९८२ साली रणजीत गुहा आणि त्यांच्या सहकारी अभ्यासकांनी 'सबाल्टर्न स्टडीज' चा पहिला खंड प्रकाशित केला. या खंडाच्या प्रस्तावनेत रणजीत गुहा यांनी या नवीन इतिहास लेखन प्रवाहाविषयी आपली भूमिका व दृष्टिकोनाची मांडणी केली.[३] सबाल्टर्न स्टडीज या नावाने प्रसिद्ध झालेल्या बारा खंडांमध्ये रणजीत गुहा, पार्थ चॅटर्जी, गायत्री चक्रवर्ती - स्पिवाक, शाहिद अमीन, डेव्हिड हार्डीमन, डेव्हिड आर्नोल्ड, ग्यानेन्द्र पांडे, सुमित सरकार, ग्यान प्रकाश, दीपेश चक्रवर्ती, गौतम भद्र, सुजी थारु, इशिता बॅनर्जी, कांचा इलाया इत्यादी अभ्यासक आधुनिक भारत व वसाहतोत्तर काळातील भारताची चिकित्सा करताना दिसतात तसेच शोषित-अंकित जनसमूहांच्या विविध चळवळींचा अभ्यास, आधुनिक भारतामधील त्यांच्या विविध योगदानाचा आढावा या सर्व अभ्यासकांनी घेतलेला आहे, जो आजपर्यंतच्या इतिहास लेखनामध्ये आलेला दिसून येत नाही. शेतकरी, कामगार, आदिवासी, दलित व स्त्रियांच्या चळवळीतील विविध समूह व व्यक्तींचे योगदान, त्यांनी केलेला संघर्ष व प्रतिकार यातून निर्माण झालेल्या त्यांच्या स्वतंत्र जाणिवा यांचा अभ्यास या इतिहास लेखन प्रवाहातील काही अभ्यासक करतात. यासाठी ते नवीन सैद्धांतिक मांडणी व पद्धतींचा अवलंब करतात.

भारतामध्ये इतिहास लेखनाच्या विविध परंपरा दिसून येतात. त्यांनी केलेल्या इतिहास लेखनाचा बाज उच्चवर्गीय आणि उच्चवर्णीय राहिलेला आहे असे दिसून

येते. साम्राज्यवादी व राष्ट्रवादी अभिजनवादी इतिहास प्रवाहाने शोषित-अंकित समूहांच्या समस्यांचा व जाणिवांचा उल्लेख केलेला नव्हता म्हणून सबाल्टर्न इतिहासकारांना नवीन इतिहास लेखनाची सुरुवात करावी लागली. फुले-आंबेडकरांच्या नंतर सबाल्टर्न प्रवाहानेच भारतीय समाजातील दुर्लक्षित घटकांचा विचार करून त्यांना इतिहास लेखनात स्थान द्यावयास सुरुवात केली.[४] वैशाली दिवाकर यांच्या मते, 'भारतीय राष्ट्रवाद म्हणजे अभिजनांची आध्यात्मिक चरित्र असून भारतीय राष्ट्रवादाचे अनैतिहासिक पद्धतीने आजवर लेखन झाले असे सबाल्टर्नने नमूद केले.'[५]

अभिजनवादी इतिहास लेखनाला विरोध करून दक्षिण आशियातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळीचा एक नवा ऐतिहासिक अन्वयार्थ या सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने मांडला. सबाल्टर्न प्रवाहाने वसाहतवादी (साम्राज्यवादी), राष्ट्रवादी व मार्क्सवादी या तिन्ही इतिहासलेखनाच्या प्रवाहावर टीका करून नवीन पद्धतीचे सिद्धांकन व अन्वेषण आपल्या लेखनाद्वारे मांडले. सबाल्टर्न इतिहासकारांनी अंतोनिओ ग्रामशी आणि ब्रिटिश मार्क्सवादी इतिहासकारांना प्रेरणादायी मानून 'हिस्टरी फ्रॉम बिलो' म्हणजेच तळागाळातील लोकांचा इतिहास (तळाकडून इतिहास) आपल्या लिखाणाद्वारे मांडला.

१९८२ नंतर सबाल्टर्न विचारप्रवाह भारतामध्ये पोहोचल्यानंतर भारतातल्या समाजधुरीणांनी व अभ्यासकांनी सबाल्टर्न विचारप्रणाली म्हणून स्वीकारली आणि त्यावर अनेक अभ्यासकांनी या लेखन प्रवाहावर आपले विचार व्यक्त केलेले दिसतात. त्याचे प्रतिबिंब काही साहित्यामध्ये पडले. मानव्यविद्या, सामाजिक शास्त्रे विशेषत: करून इतिहास लेखनावर प्रतिबिंब पडले आणि त्याने एक स्वतंत्र प्रवाह म्हणून भारतामध्ये जम धरला. उत्तर भारत, दक्षिण भारत तसेच पूर्व भारत म्हणजेच प्रामुख्याने पश्चिम बंगाल आणि पश्चिम भारतामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये अनेक अभ्यासकांनी सबाल्टर्न विचारप्रवाहावर आपले विचार मांडलेले दिसतात. दिल्ली, पश्चिम बंगाल व महाराष्ट्रातील अभ्यासकांनी त्याचा विशेष विचार करून लेखन-संशोधन केल्याचे दिसते.

भारतीय सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने तळातून इतिहास लेखन करताना इतिहासातील उपेक्षित वर्गाचे रेखाटन केले परंतु जात व स्त्री या वर्गाकडे विशेष लक्ष दिले नाही. १९८२च्या नंतर महाराष्ट्रातील अनेक अभ्यासकांनी सबाल्टर्न स्टडीज लेखन प्रवाहाचा अभ्यास करून शोषित अंकित समूहांचे प्रश्न ऐरणीवर आणण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न केला आणि जातीय शोषणाच्या चौकटी विस्तृत केल्या. यामध्ये

प्रामुख्याने शरद पाटील, अरविंद देशपांडे, शाम कायंदे, गोपाल गुरु, उमेश बगाडे, प्रवीण चव्हाण, किशोर गायकवाड, नारायण भोसले इत्यादींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. जात वर्ग लिंगभावावर आधारित नवीन मांडणी त्यांच्या अनेक ग्रंथातून व लेखांमधून आपणास पाहायला मिळते. महाराष्ट्रामध्ये सबाल्टर्न स्टडीजच्या लेखनाच्या मर्यादा अधोरेखित करून या व इतर अनेक इतिहासकारांनी व अभ्यासकांनी शोषित अंकित जनसमूहांच्या चळवळीवर लेखन करून काही आक्षेप घेत सबाल्टर्न लेखन प्रवाह विकसित करण्याचा प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील इतिहासकार, विचारवंत व कार्यकर्त्यांनी केलेल्या लेखनामुळे सबाल्टर्न स्टडीजच्या सहाव्या खंडानंतर जातीचा प्रश्न त्यांनी आपल्या लेखनामध्ये मांडलेला दिसून येतो. जातीचा प्रश्न घेण्यासाठी महाराष्ट्रातील अभ्यासकांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते कारण महाराष्ट्रामध्ये चर्चेची सघन परंपरा आहे.

भारतीय विचारवंत व कार्यकर्त्यांनी सबाल्टर्न प्रवाहावर आक्षेप नोंदवत दुरुस्त्या सुचवल्या आहेत विशेषत: त्या जातीय व लिंगभावाचा अन्वयार्थाच्या राहिलेल्या आहेत. भारतामध्ये सबाल्टर्न स्कूलला सक्षम प्रतिक्रिया देण्यामध्ये महाराष्ट्र अग्रेसर होता. सबाल्टर्न वर्गाच्या आकलनासाठी महाराष्ट्राने अकादमिक आणि चळवळीच्या पातळीवर एक चिकित्सेची फुले-आंबेडकरांकडून आलेली परंपरा विकसित करायचा प्रयत्न केलेला आहे. शरद पाटील यांनी महाराष्ट्रात फुले-आंबेडकर हे दर्शन आहे, तत्वज्ञान आहे हा मोठा वाद १९८०च्या दशकात उभा केला आणि फुले-आंबेडकर हे तत्वज्ञानी होते याची मांडणी करण्यासाठी त्यांनी सक्षमपणे ग्रामशी वापरला.[६]

तत्वज्ञान हे समाजाच्या गतीला समजून घेणारे असते म्हणून ते तत्त्वज्ञान बनतात व टिकतात हा विचार घेऊन महाराष्ट्रातल्या फुले-आंबेडकरी आणि आधुनिक मार्क्सवादी अभ्यासकांनी मार्क्सवादाचा विस्तार करण्यासाठी सबाल्टर्न विचार व ग्रामशी वापरला. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील जातिव्यवस्थेचा व्यूह भेदण्यासाठी वापर केला. त्यांनी ग्रामशीचे तत्वज्ञान भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात जोडून घेऊन उकल केलेली दिसून येते.

सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाचे नवीन पद्धतीने सिद्धांतन व अन्वेषण रोझालिंड ओ' हॅनलन व गेल ऑम्वेट या विदूषींनी आपल्या लेखनाद्वारे मांडले. त्यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुक्तिदायी लढयाचे विश्लेषण करत दलित चळवळीवर लिखाण केले व त्यांचे जीवन, समस्या, संघर्ष, विचारविश्व व प्रतिकार अधोरेखित केले.

सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहावर नंतरच्या काळातील अनेक अभ्यासकांनी व संशोधकांनी विविध आक्षेप घेत प्रवाहाचे टिकात्मक अवलोकन करून प्रवाहाच्या मर्यादा मांडलेल्या आहेत. सुमित सरकार, विनय भाल, विनय लाल, हिमानी बॅनर्जी इत्यादींनी आपल्या लिखाणातून सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाच्या मर्यादा दाखवून दिलेल्या आहेत. सुमित सरकार यांनी त्यांच्या पुस्तकात 'रायटिंग सोशल हिस्टरी' मध्ये 'द डिक्लाइन ऑफ द सबाल्टर्न इन सबाल्टर्न स्टडीज' या लेखातून सबाल्टर्न लेखन प्रवाहाच्या मर्यादा स्पष्ट करतात.[७]

डॉ. उमेश बगाडे यांच्या मते सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने महात्मा फुले, रामस्वामी पेरियार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीकडे दुर्लक्ष केले तसेच या लेखन प्रवाहावर प्रवाहाने नंतरच्या काळात उत्तर संरचनावाद व आधुनिकोत्तर काळातील विविध संकल्पनांचा वापर केल्यामुळे त्यांची मांडणी अधिक गुंतागुंतीची झालेली दिसून येते असे आक्षेप मांडले.[८] सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने अनेक शोषित वंचित समूहांच्या चळवळीमधील दुवे अधोरेखित केलेले नाहीत किंवा दुर्लक्षित केलेले आहेत.

डॉ. गोपाल गुरु यांनी आपल्या 'सबाल्टर्नवादी दृष्टिकोन व दलित-एक समीक्षा' या लेखात सबाल्टर्न लेखन प्रवाहाचे योगदान स्पष्ट करून या प्रवाहाचे काही आक्षेपही मांडतात. त्यांच्या मते, 'मुख्य प्रवाही इतिहासशास्त्राने सबाल्टर्नचे ऐतिहासिक स्थान हे मध्यवर्ती न आणता, त्याला कायम परिघावर ठेवले किंवा काही बाबतीत इतिहासातून हद्दपार केले, अशा बहिष्कृत मानखंडित सबाल्टर्न आवाजाला त्याच्या इतिहासाला विश्लेषणाच्या राजकारणाच्या इतिहासाच्या केंद्रस्थानी आणून त्याची क्रांतिकारी ओळख जगाला पटवून देण्याची महत्त्वाची कामगिरी या अन्वेषण पद्धतीने केली आहे.....सबाल्टर्न समूहांनी केलेल्या, दमण-शोषणविरोधी विविध चळवळी, वेळोवेळी केलेल्या प्रतिकाराची नव्याने मांडणी या अन्वेषण पद्धतीने केली आहे. मुख्यप्रवाही इतिहासकारांनी ज्यांच्या स्वातंत्र्याची व अस्मितेच्या प्रतिकाराची दखल घेतली नाही, अशा दुर्लक्षितांच्या जाज्वल्य इतिहासाची मांडणी या दृष्टिकोनातून केली आहे.....तळागाळातील दैनंदिन संघर्ष स्थानिक पातळीवरील शोषणाच्या सत्ताकेंद्राविरोधी दैनंदिन प्रतिकार करणाऱ्या बांधावरच्या परीघावरच्या स्त्री-पुरुषांचे क्रांतिकारी डावपेच विचारव्यूह या सबाल्टर्न विचारपद्धतीने मुख्य परंपरेला विचारलेले प्रश्न या अतिशय क्लिष्ट पण महत्त्वाच्या जाणिवांच्या, विचारांचा व राजकारणाचा पातळीवर होणाऱ्या सगळ्या घडामोडी उलगडून दाखवण्याची ताकद व निर्मळपणा

या दृष्टिकोनात आहे.' डॉ. गोपाळ गुरु यांनी सबाल्टर्न दृष्टिकोनाच्या मर्यादा सुद्धा अधोरेखित केल्या आहेत. त्यांच्या मते या दृष्टिकोनावर नंतरच्या काळात उत्तर संरचनावादाचा प्रभाव पडलेला दिसून येतो तसेच स्थानिक सत्ता केंद्राची व्यापक पातळीवर वावरणाऱ्या दमणाच्या प्रक्रियेशी गुंफण लक्षात घेत नाहीत, असे आक्षेप घेऊन सबाल्टर्न प्रवाहाला अनेक प्रश्न विचारतात.[९]

रणजीत गुहा, पार्थ चॅटर्जी, कांचा इलाया यांचे लिखाण जातीच्या प्रश्नाला हात घालणारे आहे पण या प्रवाहाने भारताच्या विविध भागात उदयास आलेल्या दलित चळवळीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. त्यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिदायी लढ्याच्या चळवळीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. रणजीत गुहांच्या अगोदर महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सबाल्टर्न समूहांच्या चळवळीवर लेखन करून शोषित-अंकित समूहांचे प्रश्न मांडलेले दिसून येतात.

एकोणिसावे शतक केवळ महाराष्ट्राच्या दृष्टीने नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे मानले जाते कारण याच कालखंडात समाजसुधारणेचे वारे महाराष्ट्रात वाहू लागले. महाराष्ट्रातील प्रबोधनाला सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीने सुरवात झाली. महाराष्ट्रात पाश्चात्य शिक्षण घेऊन विचारवंत आणि सुधारकांची जी पहिली पिढी निर्माण झाली त्या पिढीतील काही तरूणांनी येथील समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी समाजसुधारणेची चळवळ सुरू केली.

महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांनी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक बदल घडवून देशाच्या जडणघडणीत मोलाचा हातभार लावला. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच महाराष्ट्रात तळागाळातील लोकांची चळवळ उदयास आली. यात प्रामुख्याने आदिवासी चळवळ, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, स्त्री उद्धाराची चळवळ, दलित चळवळ इत्यादींचा समावेश होतो. या चळवळीचे नेतृत्वसुध्दा महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी व समाजसुधारकांनी केले.

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाला वेगळे वळण देण्यात आणि येथील समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यात दलित चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय समाजात शेकडो वर्षांपासून उपेक्षितांचे जीवन नशिबी आलेल्या दलित लोकांना जागृत करून त्यांना नवा आत्मविश्वास प्राप्त करून देण्याचे कार्य या चळवळींनी केले आहे. या चळवळीच्या माध्यमातून त्यांच्यावर होत

असलेल्या अन्यायाची खरी जाणीव महाराष्ट्राच्या समाजसुधारकांनी करून दिली व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपयुक्त असे कार्य केले होते.

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा म्हणजे ख-या अर्थाने मानवमुक्तीचा लढा होता. त्यांनी सुरू केलेल्या चळवळीने दलितांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली व त्या हक्कांच्या प्राप्तीसाठी आवश्यकता भासल्यास संघर्ष करण्याचीही प्रेरणा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या चळवळीच्या जोरावर या देशातील दलितांना सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, परंतु या प्रवाहाने महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिदायी लढ्याच्या चळवळीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

भारताच्या विविध भागात उदयास आलेल्या दलित, आदिवासी, शेतकरी, कामगार व स्त्री वर्गाच्या चळवळीकडे विशेष लक्ष दिले नाही. सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहास भारतातील ईशान्येकडील राज्याच्या आदिवासी समूहांच्या चळवळीचा पूर्णपणे विसर पडलेला दिसून येतो. त्यामुळे सबाल्टर्न इतिहास लेखनाच्या मर्यादा ओळखून या समूहांच्या प्रश्नांची, समस्यांची व चळवळींची नव्याने मांडणी अनेक अभ्यासक करताना दिसतात.

सबाल्टर्न इतिहासलेखन प्रवाहाने विविध आक्षेपाला उत्तर देत, कधी-कधी दुर्लक्ष करत आपले लेखन विस्तारित केले. सबाल्टर्न स्टडीज लेखन प्रवाहाच्या काही मर्यादा जरी असल्या तरी या सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने भारताच्या इतिहास लेखन शास्त्रामध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे हे नाकारता येणार नाही. नव्या युगातील संशोधकांनी याच दुर्लक्षित केलेल्या शोषित-अंकित समूहांच्या चळवळी व त्यांचे अनुभव नव्या दृष्टिकोनातून अभ्यासणे गरजेचे आहे व ज्या गोष्टी इतिहास लेखन शास्त्रामध्ये मांडायच्या राहून गेल्या आहेत त्या नव्याने मांडण्याची गरज आहे. जात, वर्ग व लिंग भावावर आधारित असलेली असमानता याचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून नव्याने अभ्यास करण्याची गरज आहे, त्यामुळे या राष्ट्रीय चर्चासत्रातून संशोधकांनी नवीन साधने, पद्धती व अन्वेषणाच्या आधारे या चळवळींची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या शोधनिबंधातून वर्ग जात लिंगभाव व समाज यांचा आंतरसंबंध पद्धती, संरचना, अनुभव, राजकारण, प्रतिकार आणि संघर्ष हा ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शोषित-अंकित जनसमूहांचा इतिहास व चळवळी यांचे सामर्थ्य आणि मर्यादांच्या चिकित्सक अभ्यासासाठी या दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातील इतिहास विभागाने इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, नवी दिल्ली यांच्या आर्थिक सहकार्यामुळे दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन 'भारतातील शोषित-अंकित जनसमूहांच्या चळवळी: समस्या आणि आव्हाने' या विषयावर १० व ११ जानेवारी २०२० रोजी करण्यात आले होते. यात भारतातील दलित चळवळ, भारतातील आदिवासी समूहांच्या चळवळी, भारतातील स्त्री वर्गांच्या चळवळी, भारतातील शेतकरी चळवळ, भारतातील कामगार चळवळ व सबाल्टर्न स्टडीज: विकास व टिकात्मक अवलोकन असे उप-विषय हाताळण्यात आले. वरील सर्व चळवळींचीं सद्यस्थिती, समस्या व आव्हाने व भविष्यातील रणनीती या सर्व मुद्यावर चर्चा करणे, तसेच बदलता सांस्कृतिक परिघ आणि विचारव्यूह लक्षात घेऊन शोषित-अंकित जनसमुदायापुढील आव्हाने अधोरेखित करून त्या आव्हानांना सामोरे जाण्याची संरचना आणि शक्यता कोणती असेल याचा अनुबंध तपासणे हाही या चर्चासत्राचा उद्देश होता.

इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च, नवी दिल्ली अर्थात आय.सी.एच.आर.चे मोलाचे आर्थिक सहकार्य लाभलेल्या या चर्चासत्रास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सुप्रतिष्ठित प्राध्यापक, ख्यातनाम इतिहासकार व आय.सी.एच.आर. चे सन्माननीय सदस्य प्रा. श्री. म. उर्फ राजा दीक्षित हे प्रमुख पाहुणे म्हणून तर लुईस गिडो कारली विद्यापीठ, रोम, इटलीतील राजकीय सिद्धांतांचे अभ्यासक प्रा. सेबेस्तीनो मेफेतिनो हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभागाचे प्रमुख तसेच नामवंत समाज-संस्कृती विश्लेषक व प्रसिध्द इतिहासकार प्रा. उमेश बगाडे यांनी चर्चासत्राचे बीजभाषण केले व सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाह, शोषित-अंकित जनसमूहांच्या इतिहासाचे लेखन आणि त्यांच्या चळवळीवर अत्यंत महत्वपूर्ण आणि टिकात्मक विश्लेषण केले. दीनदयाल उपाध्याय गोरखपूर विद्यापीठातील इतिहास विभागातील प्राध्यापक व आय.सी.एच.आर. चे सन्माननीय सदस्य प्रा. हिमांशु कुमार चतुर्वेदी आणि आय.सी.एच.आर. चे निर्देशक डॉ. ओम जी. उपाध्याय विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

चर्चासत्रातील विशेष सत्रांमध्ये सबाल्टर्न स्टडीज: विकास व टिकात्मक अवलोकन, भारतातील शेतकरी आणि कामगार चळवळी, स्त्रियांच्या चळवळी, दलित चळवळ, आदिवासी चळवळ अशी उपसूत्रे घेण्यात आली होती. मुंबई विद्यापीठाच्या तत्वज्ञान विभागातील प्रा. कंचना महादेवन तर इतिहास विभागातील प्रा. मंजिरी कामत, नवी